दि. 06/03/2026

# प्रेसनोट

## पोलीस उप महानिरीक्षक यांच्या पथकाचे लातूरमध्ये छापे

## गुटखा व मटका कारवाईत 91 हजारांचा मुद्देमाल जप्त

नांदेड परिक्षेत्रातील अवैध व्यवसायांना पायबंद घालण्यासाठी पोलीस उपमहानिरीक्षक श्री शहाजी उमाप यांनी लातूर जिल्हयात पोलीस पथक रवाना केले होते.

सदर पथकाने, दिनांक 05.03.2026 रोजी पोलीस ठाणे विवेकानंद चौक हद्दीतील करीम नगर येथील घरामध्ये छापा टाकून, अवैधरित्या विक्री करण्यासाठी साठवून ठेवलेला 69,485/- रुपयांचा गुटखा जप्त केला आहे. या प्रकरणी आरोपी इम्रान इसाक पठाण , वय 28 वर्ष, रा. करीमनगर, लातूर याच्याविरुद्ध विवेकानंद चौक पोलीस ठाणे येथे गुरनं 145/2026 कलम 123, 274, 275, 223 भारतीय न्याय संहिता अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस ठाणे विवेकानंद चौक येथील सपोनि वसंत मुळे हे तपास करीत आहेत.

सदर प्रकरणात, आरोपीकडून जप्त केलेला गुटखा त्याने विक्रीसाठी कोठून आणला होता, तसेच कोणत्या मार्गाने व कोणत्या वाहनांद्वारे त्याची वाहतूक करण्यात आली व शहरामध्ये त्याचा कोणकोणत्या ठिकाणी पुरवठा करण्यात येतो, याबाबत सखोल तपास सुरू आहे. यामध्ये पुरवठा साखळी उघड करण्याच्या दृष्टीने पडताळणी करण्यात येत आहे.

तद्नंतर सदर पथकाने, लातूर शहरातील एम.आय.डी.सी. पोलीस ठाण्याच्या हद्दीत आमलेश्वर नगरात रेल्वे लाईनचे बाजूला शिवराज चनप्पा शेटे कॉम्लेक्समध्ये मटका बुक्कीवर कारवाई करत, 11,620/-रुपयांची रोकड व 10 हजार रुपयाचा एक मोबाईल असा एकूण 21,690/- रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून, नमूद प्रकरणात एकूण (13) आरोपीतांना ताब्यात घेवून, त्यांचेविरुध्द एम.आय.डी.सी. पोलीस ठाणे येथे गुरनं 102/2026 कलम 12 (अ) महाराष्ट्र जुगार कायदा अन्वये गुन्हा नोंदवून, त्याचा तपास एम.आय.डी.सी. पोलीस ठाण्यातील पोहेकॉ/ दामोदर मुळे यांच्याकडे सोपविण्यात आला आहे.

उपरोक्तप्रमाणे दोन्ही कारवायांत विशेष पथकाने, 69,485/- रुपयांचा गुटखा व 21,690/- रुपये नगदी व मोबाईल असा एकूण 91, 175 /- रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

सदर कारवाईत पोलीस उपनिरीक्षक पंकज इंगळे यांचेसह पोहेकॉ/ प्रदिप खानसोळे, पोहेकॉ/संजीव जिंकलवाड, पोकॉ/ गणेश धुमाळ व पोकॉ/ कामाजी गवळी यांनी सहभाग घेतला. पथकाच्या उल्लेखनीय कामगिरीबाबत पोलीस उप महानिरीक्षक श्री शहाजी उमाप यांनी पथकातील अधिकारी व अंमलदारांचे अभिनंदन केले आहे.

आपल्या भागातील अवैध व्यवसायांची माहिती, नागरिकांनी नजीकच्या पोलीस ठाण्यास अथवा पोलीस उप महानिरीक्षक कार्यालयाच्या nandedrange.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर किंवा 91 50 100 100 या ‘खबर’ हेल्पलाइनवर कळवून अशा अवैध व्यवसायांचा बिमोड करण्यासाठी आपला हातभार लावावा, असे आवाहन नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उप महानिरीक्षक श्री शहाजी उमाप यांनी केले आहे.

पोलीस उपमहानिरीक्षक कार्यालय,
नांदेड परिक्षेत्र, नांदेड